एस.सी.सी.क्रं.६१६०/२०२०
नि. क्रमांक. ०८ खाली.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०८ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-
माझे नाव :- कविराज महादेव पाटोळे,
वय सुमारे :- ६४ वर्षे, व्यवसाय :- सहायक पोलीस उपनिरीक्षक(सेवानिवृत्त)
रा. :- तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत</u>**

दि. ०३/०२/२०२० रोजी मी वडगाव मावळ पोलीस ठाण्यात ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत होतो. गुन्हा नोंद क्र. ३२/२०२० ची फिर्याद मी दाखल केली होती. सदरची फिर्याद लक्ष्मण ठाकर यांनी अपघाताबाबत नोंदवली होती. फिर्यादीने अशी फिर्याद दिली होती की, त्याचे नातेवाईक श्रीपती महादु ठाकर हे पुणे मुंबई महामार्गावर हॉटेल ब्लॉसम, कान्हे फाट येथे रस्त्याने पायी येत असतांना त्याना पाठीमागून ब्रिझा या गाडीने धडक मारल्याने त्यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली होती व ते मयत झाले होते.

०२. गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हयाचा तपास वरिष्ठांनी माझ्याकडे सोपवला. गुन्हा तपासासाठी माझ्याकडे आल्यानंतर मी फिर्यादीसोबत तळेगाव येथील शासकिय दवाखान्यामध्ये मयताचा मरणोत्तर पंचनामा करण्यासाठी गेलो. दवाखान्यात मी दोन पंचांसमक्ष मयताचा मरणोत्तर पंचनामा तयार केला. मयतास मी शवविच्छेदनासाठी पाठवले. शवविच्छेदनानंतर मी घटनास्थळी गेलो. दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. पंचनाम्यावर माझी सही आहे. पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास यापूर्वीच नि. क्र. १२/क देण्यात आलेला आहे.

०३. तपासादरम्यान मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तपासादरम्यान मी आरोपीकडे चौकशी केली. अपघातातील ब्रिझा गाडी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड यांच्याकडे पत्राव्दारे तपासणीसाठी पाठवली. आता मला दि. १०/०२/२०२० रोजीचे पत्र दाखवले सदर पत्रावर माझी सही आहे. पत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. पत्रास **नि. क्र. १५/क** देण्यात येते. वाहन तपासणीचा अहवाल मी हस्तगत केला. तपासादरम्यान मी मयताचा शवविच्छेदन अहवाल हस्तगत केला.

०४.		मी केलेल्या तपासावरुन मला असे दिसून आले की, ब्रिझा गाडी नोंदणी क्र. एम एच १४ ९६५९ वरील चालक शशिकांत एकनाथ कुटे याने त्याच्या ताब्यातील गाडी मुंबई पुणे हायवेवर हॉटेल ब्लॉसम येथे अविचाराने, हयगयीने व भरधाव वेगात चालवून पादचारी इसम श्रीपती महादू ठाकर यास पाठीमागून ठोकर मारुन अपघात केला व त्याच्या पायास व डोक्यास गंभीर दुखापतीस कारणीभूत झाला तसेच त्याच्या मनुष्यवध या सदरात न मोडणा-या मृत्यूस कारणीभूत झाला. आरोपीस पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयामध्ये हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. विश्वनाथ जाधव  यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

०५.		दि. ०३/०२/२०२० रोजी मी पोलीस ठाण्यामध्ये सकाळी ९ ते संध्याकाळी ९ अशी ठाणे अंमलदार म्हणून डयुटी करत होतो. गुन्हयाचा तपास करण्याचे आदेश मला तोंडी दिले होते. पोलीस ठाण्यातून तळेगाव येथे शासकिय दवाखान्यात जाण्यासाठी १५ मिनीटे लागतात. दवाखान्यातू घटनास्थळावर जाण्यासाठी अध्र्या तासाचा वेळ लागतो. मयताचा मरणोत्तर पंचनामा व शवविच्छेदन करण्यासाठी अध्र्या तासाचा कालावधी लागला होता.  हे म्हणणे खरे नाही की, मी मरणोत्तर पंचनामा झाल्यानंतर लागलीच घटनास्थळावर गेलो होतो. मी घटनास्थळावर गेलो त्यावेळी मी घटनास्थळावर मयत इसमाची तुटलेली चप्पल, टोपी पाहिली.

०६.		तपासादरम्यान मी घटनास्थळाचे फोटो घेतले होते. घटनास्थळावर काढलेल्या फोटोमध्ये ब्रिझा गाडी दिसत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस मोटर वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीस पाठवली नव्हती. मी सदरची नोटीस अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदरची नोटीस अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मयतास घटनास्थळावरुन दवाखान्या नेले त्या रुग्णवाहिकेच्या चालकाचा जबाब मी नोंदवलेला नाही.  हे म्हणणे खरे आहे की, मी तपासादरम्यान मयताच्या नातेवाईकाचे जबाब नोंदवलेले आहेत.   हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे नाव हे मी संशयावरुन गुन्हयामध्ये नोंदवलेले आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मयतास केवळ विमा मिळावा म्हणून फिर्यादीमध्ये आरोपीचे नाव नमुद केलेले आहे.

०७.		हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा घटनास्थळ पंचनाम तयार केलेला आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी मरणोत्तर पंचनामा चुकीचा तयार केलेला आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे.  हे म्हणणे खरेय नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

**Sd/xxx**

**दिनांक. १४/०८/२०२६**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**